# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–०४

## जुलै–ऑगस्ट २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबत...

## प्रकटन

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च–एप्रिल २०२२ परीक्षेचा निकाल माहे जून २०२२ मध्ये जाहीर झालेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत पुरवणी परीक्षा जुलै–ऑगस्ट २०२२ मध्ये घेण्यात येणार आहे. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे ) Transfer of Credit घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने इ.१२वी साठी www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी उच्च माध्य.शाळा/ कनिष्ठ महाविदयालया मार्फत पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी **(परीक्षेस प्रविष्ट न झालेले)**, श्रेणी सुधार व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे, **ITI** (औघेगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे **Transfer of Credit** घेणारे विद्यार्थी)ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | उच्च माध्य. शाळांनी /कनिष्ठ महाविदयालयांनी **बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा** | उच्च माध्य.शाळा/कनिष्ठ **महाविदयालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख** |
|---|---|---|---|
| **नियमित शुल्क** | **शुक्रवार, दिनांक १०/०६/२०२२ ते शुक्रवार, दिनांक १७/०६/२०२२** | **शनिवार, दिनांक १८/०६/२०२२ ते मंगळवार, दिनांक २१/०६/२०२२** | **बुधवार दिनांक २२/०६/२०२२** |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

१. ऑनलाईन आवेदनपत्र भरताना मार्च–एप्रिल २०२२ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.
२. श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जुलै–ऑगस्ट २०२२ व फेब्रुवारी–मार्च २०२३ अशा लगतच्या दोनच संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.
३. नियमित शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क चलनाव्दारेच भरण्यात यावे.
४. सर्व विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलीत शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बॅकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.
५. आवेदनपत्रे नियमित शुल्काने भरावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

दिनांक – ०८/०६/२०२२

(माणिक बांगर )
सचिव ( प्र.),
राज्य मंडळ, पुणे–०४.